P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक - ०२/११/२०२३**

**दि.०१/११/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५६२/२०२३ भा.द.वि. कलम ३०२,३६३ ,३६४,३४२,१७०,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३१/१०/२०२३ रोजी १३/३० वा. ते १/११/२०२३ रोजीचे १२/३० वा.सोमवारपेठ ७४१/७४२, डॉक्टर उनकुले यांचे हॉस्पीटलचे समोर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे तसेच चिंचवड पुणे व टाकवे ता मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/११/२०२३ रोजी २१.२१ वा |
| फिर्यादी | :- | किरण शंकर खोल्लम वय ४८ व्यवसाय - ड्रायव्हर, रा. सोमवार पेठ ७४१/७४२, डॉक्टर उनकुले यांचे हॉस्पीटलचे समोर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | १) शिवाजी राजाराम गरूड वय ६५ वर्षे रा टाकवे बु।। ता.मावळ जि.पुणे,<br>२) अनिल शिवलिंग कोळी, वय ४५ वर्ष रा. फ्लॉट नं. बी/५ कृष्णनगरी सोसायटी वतननगर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे यास वतननगर तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे<br>**आरोपी क्रं १ व २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी रहात असलेल्या पत्यावर आरोपी क्रं १ व २ तसेच त्यांचे सोबत इतर दोघे असे फिर्यादी यांचे घरात बळजबरी घूसून पोलीस आहे अशी बतावणी करुन, फिर्यादीचे सासरे श्रीकृष्ण उध्दवराव टकले , वय ६५ वर्षे यांना बळजबरी गाडीत बसवून व त्यांचे सोबत फिर्यादी यांना देखील घेवून सुरुवातीस आरोपी क्रं १ यांची मुलगी हीचे घरी चिंचवड, पुणे येथे नेवून तेथे फिर्यादी यांचे सासरे यांना बेल्टने, हाताने लाथाबुक्कांयाने पैशाकरीता मारहाण करुन नंतर टाकवे ता.मावळ येथे नेवून त्यांना पुन्हा त्यांना मारहाण करुन त्यांचा खून केला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि पाटील (गुन्हे )७०२०३३११९९ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ५७३/२०२३ भा.द.वी.कलम ३०७,३४<br>भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०१/११/२०२३ रोजी पहाटे ०३.३० वा. चे सुमारास पिंपळे गुरव, पुणे येथील मयुर नगरी फेज ०१ व फेज ०२ च्या मधील सार्वजनिक रस्त्यावरुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/११/२०२३ रोजी २३/१६ वा. |
| फिर्यादी | :- | प्रतिक प्रदिप सरोदे, वय २८ वर्षे, धंदा सिक्युरिटी, जात नवबौध्द, रा. के/ऑ., चव्हाण, चव्हाण यांची बिल्डींग (बिल्डींग नं. ०२) गल्ली नं. ०४, रामनगर, पिंपळे गुरव, पुणे. मुळगाव मु. पो. मारुंजी, ता. मुळशी. जि. पुणे. |
| आरोपी | :- | १) विपुल अजय चव्हाण वय २१ वर्षे काटे पुरम चौक आनंद पार्क नवी सांगवी<br>२) केतन चंदिले रा.मयुरी नगरी, पिंपळे गुरव, पुणे पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पिंपळे गुरव, पुणे फेज ०१ व फेज ०२ च्या मधील सार्वजनिक रस्त्यावरुन मोटार सायकलवरुन जात असताना लक्षतारा बिल्डींगच्या समोर आले असता, तेथे फिर्यादी यांचा मित्र अनिकेत मिलिंद घोगरे, वय २२ वर्षे, हा थांबलेला दिसला व त्यास फिर्यादी यांचे ओळखीचे इसम आरोपी क्रं १व २ हे अनिकेत मिलिंद घोगरे यास शिवीगाळ करत असताना दिसले त्यामुळे फिर्यादी यांनी मोटार सायकल थांबवुन, खाली उतरुन आरोपी क्रं १ व २ यांना काय विषय आहे काय झाले आहे. असे विचारले त्यावेळी |

आरोपी क्रं २ म्हणाला “ काय विषय आहे ते सांगतो तु येथेच थांब, तुला माहित नाही का आंम्ही इथले भाई आहे.” असे म्हणाला व तेथुन निघुन गेले. ते गेल्यानंतर अनिकेत घोगरे याचेकडे झालेल्या प्रकाराबाबत विचारणा करत असताना थोडयाच वेळात आरोपी मजकुर हे त्यांचे मोटार सायकलवरुन आले व खाली उतरुन वाईट वाईट शिवीगाळ करुन हयोच होता, हयोच होता असे बोलुन आरोपी क्रं २ याने त्याचे हातातील लाकडी बांबुने फिर्यादीचे डोक्यात मारले व आरोपी क्रं १ याने त्याचे कमरेला असलेला कोयता काढुन फिर्यादीस जिवे ठार मारण्यासाठी उगारला असता, फिर्यादीने डावा हात मध्ये घातला तेव्हा फिर्यादीचे डावे हाताला जखम झाली, आरोपी क्रं १ याने पुन्हा फिर्यादीचे डोक्याचे उजव्या बाजुस कोयता मारुन जीवे ठार मारण्यासाठी वार केला त्यावेळी फिर्यादीचे डोक्यातुन रक्त स्त्राव चालु झाला त्यावेळी अनिकेत घोगरे हा भांडणे सोडविण्यासाठी आला असता, आरोपी क्रं २ याने त्याचे हातातील लाकडी बांबुने चेह-याच्या डाव्या बाजुस मारले.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- एम.डी. वरुडे पोलीस उप निरीक्षक, ९८५०६९३३३०

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ९०५/२०२३ भा.द.वि कलम २७९,३३८,३३७,४२७ मो वा का क १८४,१३४/१७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/१०/२०२३ रोजी १४/१५ वा चे सुमारास मौजे साबळेवाडी येथे इंडीयन ऑईल पंपाचे जवळ ता खेड जि पुणे

गुन्हा दाखल :- दि ०१/११/२०२३ रोजी १५.३२ वा

फिर्यादी :- अशोक राजाराम पवार वय ३५ व्यावसाय- मजुरी रा मु पो कासारी ता शिरूर जि पुणे

आरोपी :- टाटा कंपनीची कॅरी गाडी नंबर एम एच १४ एफ टी १२२९ वरील चालक नाव पत्ता माहीत नाही

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाउ नामे बबन राजाराम पवार वय ५२ वर्षे व वहिनी जनाबाई बबन पवार वय ४८ असे चाकण शिक्रापुर हायवेने ता शिरूर येथे बजाज मोटर सायकल नंबर एम.एच.१२/झेड.ए.२३७४ वरून जात असतांना शिक्रापुरकडुन चाकण बाजुकडे जाणारी टाटा कंपनीची कॅरी गाडी नंबर एम.एच.१४/एफ.टी.१२२९ वरील अज्ञात चालकाने त्याचे ताबेतील वाहन भरधाव वेगात ,हयगयीने व अविचाराने चालवुन समोरून फिर्यादी यांचा भाउ चालवत असलेल्या मोटर सायकल नंबर एम.एच.१२/झेड.ए.२३७४ हिस ठोस देवुन अपघात करून अपघातात फिर्यादी यांचा भाउ बबन व वहिनी यांना किरकोळ व गंभीर दुखापत करून मोटर सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ मोरे ९८३३९८३२९१

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ५९४ /२०२३ भादवि कलम ४०६,४२०,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३१/०३/२०२३ रोजी १७/३० वा चे सुमा,गुरूव्दारासमोर, देहुरोड, पुणे

गुन्हा दाखल :- दि. ०१/११/२०२३ रोजी १५/३६ वा

फिर्यादी :- अनिल प्रकाश पाटील, वय ४२ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. फ्लॅट नं.१८, यशश्री संकुल, बी विंग, एन.डी.ए. रोड, पोकळे नगर, शिवणे, पुणे

आरोपी :- १) मिकी सिंग, मोनं. ८४८३९४३८६०
२) कुलदिपसिंग मोनं. ८५३०३०४३८०

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आरोपी मजकुर यांना २,५९,२००/- रु किं चे बिल व तेलाचे बॉक्स दिले त्यावेळी आरोपी क्रं २ याने फिर्यादी यांचे फर्मचे नावाने बॅक ऑफ महाराष्ट्र शुक्रवार पेठ शाखेचा चेक नं.२५४४८२ दिला. सदरचा चेक फिर्यादी यांनी बॅकेत त्यांचे टाकला परंतु बॅकेत आरोपी क्रं २ चे खात्यात पेमेंट नसल्याने सदरचा चेक वटला नाही. फिर्यादी यांनी आरोपी मजकुर यास फोन करुन पैसे मागितले असता आरोपी मजकुर याने पैसे आज देतो उदया देतो असे म्हणुन पैसे देण्यास टाळाटाळ केली आरोपी क्रं २ याने फिर्यादीस दिलेला चेक पाहिला असता सदर चेकचे बॅंकखाते अर्चना रमेश मघाडे यांचे बॅक ऑफ महाराष्ट्र खाते क्रं. ६०३७८५९९८४५ यांचे नावावर असल्याचे लक्षात आले.त्याबाबत फिर्यादी यांनी लिबर्टी ऑईलचे शेखर मुळे यांना कल्पना दिली असता त्यांनी पण आरोपी मजकुर यांना संपर्क साधला असता आरोपींनी त्यांना

उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यावेळी फिर्यादी यांचे लक्षात आले की, आरोपी क्रं१ याने २,५९,२००/- रुपये किंमतीचे लिबर्टी ऑईल चे तेलाचे बॉक्स विश्वासाने घेवुन फिर्यादी यांना पैसे न देता विश्वासघात करूनफसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि धोत्रे मो नं-९६२३४५४७४७

५

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७१६/२०२३ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०१/११/२०२३ रोजी ०१/१५ वा भाजी मंडई जवळील मोकळे मैदानाजवळ, रस्त्यावर पंतनगर चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि ०१/११/२०२३ रोजी ०४/२३ वा.

फिर्यादी :- अशोक ठका वरे, पोलीस नाईक बक्कल नंबर १५४७, नेमणुक चिखली पोलीस ठाणे, पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालय, जि. पुणे

आरोपी :- १)उमेश अशोक कांबळे वय २२ वर्षे रा.गंगोत्री हॉस्पीटल जवळ जाधववाडी चिखली पुणे
२) सुनिल पांडुरंग गायकवाड वय १९वर्षे रा.मधला पेठ जाधववाडी चिखली पुणे
३) राहुल गणेश राठोड रा. जाभुळकर कॉलनी गल्ली नंबर ६ जाधववाडी चिखली पुणे
**आरोपी क्रं १ व २ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी आपले ताब्यात बेकायदा धारदार २००/-रु किंमतीचा लोखंडी कोयता हे हत्यार जवळ बाळगुन मनाई आदेशाचा भंग करुन धारधार कोयता व त्यांच्या ताब्यातील २५,०००/-रु किं ची हिरो स्पेंडर नंबर नसलेली मो सा हिचेसह मिळुन आले आहेत.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा साकोरे ९५८८६९८१५४

६

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ४८९/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस अधि. सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३१/१०/२०२३ रोजी २०/३० वा. कळवातीन महाल माता वॉशिग सेंटरच्या पुढे, संतनगर चौकाच्या अलीकडे, सेक्टर नंबर ७, मोशी प्राधिकरण, मोशी पुणे

गुन्हा दाखल :- दि. ०१/११/२०२३ रोजी ००/४० वा

फिर्यादी :- नितिन आप्पा खेसे, वय ३४ वर्षे, धंदा नोकरी, पोलीस शिपाई २१२४ नेमणूक एम.आय. डी.सी भोसरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड

आरोपी :- अविराज भिमाशंकर घोडके वय २१ वर्षे रा. मु.पो. केसरजवळगा, ता. उमरगा, जि. धाराशिव
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा आपले कब्जामध्ये बेकायदा ३५०/- रु किं लोखंडी तलवार बाळगुन मिळुन आला असुन त्याने मा.पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांचे दि. ३१/१०/२०२३ रोजी ००/०१ वा. ते दि. १३/११/२०२३ रोजी २४/०० वा. पर्यत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्रात घातक शस्त्रे / अग्नीशस्त्रे बाळगण्यास मनाई आदेश केले असताना त्याने सदर आदेशाचा भंग केला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- ाो हवा एस .बी. शेलार ९८९२९९१९०८

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ७२०/२०२३ भा. द. वि. कलम- ३२४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १/१०/२०२३ रोजी रात्री ११:५० वाजता चे सुमारास स्पाइसर चौक कुरळी तालुका खेड जिल्हा पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/११/२०२३ रोजी १९/०३वा. |
| फिर्यादी | :- | विपिन सुरेश रेवसे वय २८ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर राहणार मोहन पार्क ऋणानुबंध बिल्डिंग रूम नंबर चार आंबेठाण चौक चाकण तालुका खेड जिल्हा पुणे मूळ राहणार ताकर खेड मोरे तालुका अंजनगाव सुरजी जिल्हा अमरावती |
| आरोपी | :- | करीम दस्तगीर तांबोळी वय ३० वर्षे राहणार राजगुरुनगर खेड जिल्हा पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे बस क्रमांक एम.एच.१२/एच.बी.२९०० ही ॲक्टिव्ह कंपनी एचपी चौक जवळ महाळुंगे येथील दुसऱ्या शीपचे सुटलेले कंपनीतील कामगार महाळुंगे ते बालाजी नगर चाकण अशी घेऊन जात असताना स्पायसर चौक येथे काही एक कारण नसताना गाडीला कट का मारला असे म्हणून आरोपी मजकुर याने फायबरचा पाईप घेऊन फिर्यादीस बसमधून खाली खेचले व फिर्यादीचे डोक्यावर व मानेवर सदर फायबरचे पाईपने मारहाण करुन फिर्यादीचे डोक्याला तीन टाके पडले व मानेवर मार लागला असुन फिर्यादीस जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो.उ.नि.)जायभाये ८८०५११९१९९ |

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी २९४/२०२३ भा द वि कलम४४७, ५०४, ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०२/०८/२०२३ रोजी १०/०० वा ते दि.०१/११/२०२३ रोजी १०/००वा पर्यंत आळंदी ग्रामीण गावचे हद्दीत वडगाव रोड पासुन थोडया अंतरावरील गोशाळेचे पाठिमागे ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/११/२०२३ रोजी १२.३२ वा |
| फिर्यादी | :- | संदिप नंदकुमार कारेकर वय-३८वर्ष, धंदा-सलुन, रा-मरकळ रोड, एस के लॉन्स समोर आळंदी देवाची ता खेड जि पुणे |
| आरोपी | :- | विश्वनाथ गोविंदराव गुटटे रा.गोशाळेचे पाठीमागे आळंदी ग्रामीण ता खेड जि पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा भाउ नितीन यांचे नावावर असलेली जमिन सर्वे नं ४४/२८ मधील १ आर क्षेत्रात नमुद आरोपी याने त्याचे मालकीची इंडिका कार न एम.एच-३८/१२०९ ही फिर्यादीचे संमतीशिवाय पार्कीग करून लावून तसेच सेंट्रींगचे फळया टाकून फिर्यादीचे जागेत अतिक्रमण करून फिर्यादीला शिविगाळ दमदाटी केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ टोके ९८२२९१४१९१ |